# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/03/2023 (शुक्रवार) सकाळ

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १० कि.मी अंतरावरील वडोदा येथे दिनांक ०९/०३/२०२३ चे १८:३० वा. ते १८:४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— देविदास श्रावनजी भुसारी, वय ३८ वर्षे, रा. अंबाडी ता. कामठी जि. नागपूर याचा भाऊ पिडीत नामे— मंगेश भुसारी व आरोपी नामे—१) रजनी पाटील रा. चिखली २) राहूल उर्फ रामा मोटघरे रा. झूल्लर दोन्ही ह. मू. वडोदा ता. कामठी जि. नागपूर हे नमुद घटनास्थळी पत्ते खेळत असतांना पिडीत मंगेश भूसारी याने गेम जिंकला असता यातील आरोपी क्र. २ याने जिंकलेले पैसे दिले नाही तर पिडीत याने पून्हा पैसे मागितले तर आरोपी क्र. २ याने पिडीत मंगेश भुसारी याचा कॉलर पकडला व आरोपी क्र. १ याने पिडीत मंगेश भूसारी याचे पाठीमध्ये चाकुने दोन ठिकाणी वार करून पिडीत याला जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि चौधरी प्रमोद मो. नं. ७०३८८२२२०५ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील कन्हान नदीचे पात्रावर बिना संगम येथे दिनांक ०७/०३/२०२३ चे १५.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रणय संजय भुते, वय २४ वर्ष, रा. रामनगर इतवारी नागपूर हा बिना संगम येथे आपल्या मित्रांसोबत आंघोळी करीता गेला असता फिर्यादीने त्याच्या खिशामध्ये असलेला मोबाईल वन प्लस ९ आर टी कंपनीचा किंमती अंदाजे १२०००/—रुपयाचा ठेवला असता मोबाईल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ. पवार ब. नं. ११९ मो. नं. ९८८११४३९२७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर